(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – II ISSN 2277-8063

# भारतीय उच्च शिक्षणावर खाजगीकरणाचा झालेला प्रभाव

**कु. रिया रवींद्र मोर** बी. ए. द्वितीय वर्ष कमला कॉलेज कोल्हापूर.

**डॉ. उदय जी. आठवले** सहाय्यक प्राध्यापक (chb) कमला कॉलेज कोल्हापूर

---

**गोषवारा** : -

देशाच्या आर्थिक विकासात उच्च शिक्षण फार महत्वाची भूमिका बाजावते. विकासाच्या दृष्टीने भारतात १९९१ मध्ये खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरणाचा अवलंब करण्यात आला. त्याचा परिणाम म्हणून समोर भारतीय शिक्षण पद्धती मध्ये देखील खाजगीकरणाचा प्रवेश झाला असल्याचे दिसते. या खाजगीकरणाचा एकूण शिक्षण व्यवस्थेवर, विद्यार्थ्यांवर काय परिणाम झाला हे या शोध निबंधाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने असली तरी या आव्हाणांवर मात करण्यासाठी आणि उच्च शिक्षण देणारी व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे या शोध-निबंधाच्या माध्यमातून समोर येतांना दिसते.

**सुचणांक शब्द:** उच्च शिक्षण, खाजगीकरण, भारतीय शिक्षण पद्धती, उच्च शिक्षणात खांजगीकरणाचे फायदे, उच्च शिक्षणात खांजगीकरणाचे तोटे.

**प्रस्तावणा :**

भारतामध्ये आधुनिक उच्च शिक्षणाची व्यवस्था ब्रिटिशांच्या माध्यमातून उभारण्यात आली. त्यापूर्वी पारंपारिक गुरुकुल पद्धतीने मर्यादित सामाजिक घटकालाच शिक्षण प्राप्त करण्याचा अधिकार होता. भारतामध्ये सार्वत्रिक उच्च शिक्षणाची सुरवात ही १८५७ मध्ये निर्माण करण्यात आलेल्या मुंबई, कलकता आणि मद्रास विद्यापीठांच्या स्थापने पासून झाल्याचे दिसते. भारतामध्ये १९०२ मध्ये 'विद्यापीठ आयोग' नेमण्यात आला. आणि १९०४ मध्ये भारतीय विद्यापीठ अधिनियम पास करण्यात आला. स्वातंत्र प्राप्ती नंतर १९४८ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली 'विद्यापीठ शिक्षण आयोगाची' स्थापना करण्यात आली. या आयोगाच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचा दर्जा व्यापक करण्याच्या दृष्टीने तसेच त्यात सुसूत्रता निर्माण करण्याकरिता 'विद्यापीठ अनुदान आयोगाची' स्थापना करण्यात आली, त्याचा परिणाम म्हणून नवीन महाविद्यालये तसेच विद्यापीठ निर्माण होऊन त्यांची विकासाच्या दिशेने वाटचाल झाल्याचे दिसते.

भारतामध्ये १००० पेक्षा अधिक विद्यापीठ असल्याचे दिसतात, त्यात ५४ केंद्रीय विद्यापीठ ४१६ राज्यातील विद्यापीठ, १२५ मानद विद्यापीठ, ३६१ खाजगी विद्यापीठे आणि १५१ राष्ट्रीय महत्वाच्या संस्था. १९८० नंतर जागतिक अर्थव्यवस्थेच्या बदलत्या मागण्या, परकीय गुंतवणुकीचा अभाव, राजकीय अस्थिरता चलनाचे घटते मूल्य आणि प्रशासनावर वाढलेला ताण; यामुळे देशात अनुदानित उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाची वाढ मंदावली. आणि खाजगी क्षेत्राच्या भूमिकेत वाढ होण्यास सुरवात झाली. १९९५ मध्ये 'खाजगी विद्यापीठ विधेयक संसदेमध्ये चर्चे करिता आणल्या गेले मात्र त्यावर २००४ मध्ये अध्यादेश काढण्यात आला. याच दरम्यान उच्च शिक्षणाच्या बाबतीत खाजगीकरण आणि उदरीकरणा चा मुक्त संचार झाला, आणि त्यांचे आजतागत भारतीय उच्च शिक्षणावर दूरगामी परिणाम झाल्याचे दिसतात.

खाजगी संस्था ह्या शासकीय हस्तक्षेपासून लांब असतात. स्वत:ची धोरणे आखण्यास आणि राबविण्यास ते जवाबदार असतात. त्यांना शासकीय अनुदान अथवा सहाय्याची आवश्यकता भासत नाही. खाजगी संस्था आली कि त्यांचा उद्देश हा नफा प्राप्त करणे असल्याचे दिसते. नफा प्राप्त करण्याचा मुख्य स्त्रोत हा विद्यार्थी असल्याचा दिसतो. ठराविक विद्यार्थी च अशी महागडी शुल्क भरण्यास तयार असतात त्यामुळे ह्या शिक्षणाची दरवाजे ठराविक गटाकरिता खुल्ली झाल्याचे दिसतात. यातून मोठा आर्थिक दृष्ट्या गरीब वर्ग हा उच्च शिक्षणापासून वंचित असल्याचा दिसतो. व्यावसायिक शिक्षणाचा विचार केला असता, इंजिनिरिंग करिता प्रती वर्ष ५० हजार ते २ लाख, वैद्यकीय शिक्षणाला प्रती वर्ष ५ ते २५ लाख तेच विधी शाखेकरिता ५० हजार तर व्यवस्थापण शी संबंधित कोर्स चे शुल्क प्रती वर्ष लाखांच्या घरात असल्याचे दिसतात. एवढ्या अवाढव्य शूल्क आकारत असल्यामुळे गरीब व मध्यम उत्पन्न असलेला गट उच्च शिक्षणापासून वंचित असल्याचा दिसतो.

भारतामध्ये २१.९ टक्के लोकसंख्या ही दारिद्र्य रेषेखाली आहे त्यांना खाजगी शिक्षण घेण्याकरिता एवढे शुल्क भरणे शक्य होत नाही. याशिवाय आणखी असा मोठा वर्ग आहे जो खाजगी संस्थाच्या अधिक च्या फिस मुळे शिक्षण घेऊ शकत नाही. अशा परिस्तितीत ज्यांच्या कडे अगोदर उत्पन्नाची सांसाधणे आहेत त्यांनाच शिक्षण घेण शक्य होते. आणि शिक्षणामुळे हाच मर्यादित वर्ग अधिक प्रबल होऊन समाजात आर्थिक विषमता निर्माण होण्यास कारणीभूत ठरते. शिक्षणाची आवड, गरज आणि इच्छा असून देखील पैशाच्या अभावामुळे अनेकांना शिक्षणापासून मुकावे लागते, आणि ते विकासाच्या प्रवाहात मागे पडतात. म. जोतिराव फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बी. आर. आंबेडकर, रामास्वामि पेरियार, कर्मवीर भाउराव पाटील तसेच म. गांधी यासारख्या अनेक समाज सुधारकांनी 'शिक्षणातून आपले परिवर्तन होऊन शोषण थांबू शकते' हे समाजावर बिंबविल्याचे दिसते. स्वातंत्र प्राप्ती नंतर शिक्षण हे सरकारी नियंत्रणात आणि आणि मोफत स्वरूपात होते. त्यामुळे शिक्षण घेण्याची संधि सर्वांना समान होती. मात्र १९९१ च्या खाजगीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केल्या नंतर हे चित्र पालटतांना दिसते.

**संशोधन साहित्याचा आढावा** – भारतातील उच्च शिक्षण आणि त्यात वेळोवेळी होत असलेल्या बदलांचा अनेक अभ्यासकांनी अभ्यास केल्याचा दिसतो. अलीकडील कालावधीमध्ये उच्च शिक्षणावर खांजगिकरणाचा बराच प्रभाव पडत असल्याचे जाणवते. त्याअनूषंगाने अनेक अभ्यासकांनी यावर भाष्य केल असल्याचे दिसते. त्यात **प्रेमदेसाई, सी. (२०१५)** यांच्या मते, उच्च शिक्षणामध्ये खांजगीकरणाचा प्रवेश झाला असल्यामुळे शिक्षणाचा दर्जा अधिक चांगला झाला असल्याचे मांडतांना दिसतात. उच्च शिक्षणातील खाजगीकरणामुळे स्पर्धात्मकता निर्माण झाली आणि सध्याच्या शिक्षण पद्धती मध्ये अनेक सुधारणा घडून आल्यात. **लेव्ही (२०१३),** यांच्या मते विशिष्ट प्रकारचे खाजगी उच्च शिक्षण हे सर्वांगीण गतीशीलतेच्या दृष्टीने असुरक्षित आहे, कमी दर्जाचे खाजगी उच्च शिक्षण हे गुणवततेमध्ये घसरण करण्यास कारणीभूत असल्याचे दिसून आले. खाजगी संस्था ह्या नफ्या करिता काम करीत असल्याच्या दिसतात. **बिदुला सरमहा (२०१३),** सार्वजनिक शिक्षण संस्थांनी अभ्यासक्रम, पायाभूत सुविधा, मूल्यमापन, कॅम्पस वातावरण या सारख्या पैलुवार लक्ष केंद्रित करायला हवे नसता खाजगी शैक्षणिक संस्था हे चांगल्या प्रकारे हाताळू शकतात. यातून सार्वजनिक संस्थांचा दर्जा कमी होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे.

**सॅम्युअल, एस. (२०१५)** यांच्या मते उच्च शिक्षणाचे खाजगीकरण झाल्यामुळे उच्च शिक्षणाची मागणी आणि पुरवठा यामधील अंतर कमी होत आहे. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात देखील उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांची वाढ होत असल्याचे त्यांनी निर्देशनास आणून दिले. आणि यातून रोजगार आणि उत्पन्नाच्या संधीत वाढ झाल्याचे दिसते. **पवार, दि. कृ.** (२०२१), यांच्या मते, भारतातील बदलत्या शैक्षणिक पद्धतीचा आढावा घेत असतांना त्यांना असे दिसून आले की, शिक्षणाचे मोठ्या प्रमाणावर खाजगीकरण होऊन त्यांचे व्यवसायकिकरण होत आहे. व त्यांचा गरिबांवर अनिष्ट परिणाम होतांना दिसतो, एकंदरीत भारतीय उच्च शिक्षणाच्या बाबतीत होत असलेल्या बदलांचा आढावा अनेक अभ्यासकांनी केलेला दिसतो, मात्र याठिकाणी सध्याच्या वर्तमान स्थितीत खांजगीकरणामुळे भारतीय उच्च शिक्षणावर कसा प्रभाव पडत गेला यांचा आढावा घेतलेला नाही, प्रस्तुत शोध-निबंधाच्या माध्यमातून संशोधकाने या समस्येवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाचा उद्देश-**

- खाजगीकरणाचा उच्च शिक्षणावर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

**संशोधन पध्दती** – प्रस्तुत शोध-निबंधमध्ये अखिल भारतीय स्तरावर खाजगीकरणामुळे कसा प्रभाव पडला हे तपासण्यात आले, त्याकरिता माहिती ही भारतापुरती मर्यादित आहे. विषयाशी संबंधित तथ्य संकलंना करिता दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला. त्यामध्ये जनगणना अहवाल, शासकीय सर्वेक्षण, संशोधन प्रबंध, विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, विश्वकोश, मासिके, वृत्तपत्र, अधिकृत संकेतस्थळे यासारख्या साधनांचा उपयोग करण्यात आला.

**उच्च शिक्षणाचे खाजगीकरण –**

शिक्षणाचे खाजगीकरण म्हणजेच, "शिक्षण क्षेत्रांमध्ये खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून व्यवस्थापन होणे त्यात शासकीय यंत्रणेचा प्रत्यक्ष हस्तक्षेप न होणे अपेक्षित असते." यांना संस्थांचे स्वरूप प्राप्त झालेले असते, शिवाय या संस्था शुल्क आकारणी अथवा सेवा शुल्क आकारून शिक्षण देण्याचे कार्य करतात. यात सेल्फ फायनान्स कौर्सेस, संस्था, महाविद्यालय आणि विद्यापीठे निर्माण करून चालवली जातात. तसचे काही शासकीय संस्था अथवा

शासकीय अनुदानावर चालत असलेल्या संस्था मध्ये देखील उच्च शिक्षण देण्याकरिता 'सेल्फ फायनान्स कौर्सेस' खाजगी स्वरूपात उपलब्ध करून दिल्या जातात.

ज्या ठिकाणी महाविद्याल आणि विद्यापीठ यांचे व्यवस्थापन आणि त्यांच्या निधीवर खाजगी संस्था चे नियमन व नियंत्रण चालते, शासण कोणत्याही स्वरूपाचे हस्तक्षेप करत नाही, त्याला शिक्षण क्षेत्रातील तीव्र किंवा टोकाचे खाजगीकरण असे म्हटल्या जाते. शिक्षण घेण्याकरिता लागणारी संपूर्ण किंमत विद्यार्थी आणि त्यांचे नियोक्ते यांच्या मार्फत वसूल केल्या जाते अशाला शक्तिशाली मजबूत खाजगीकरण असे म्हटल्या जाते. त्याचबरोबर उच्च शिक्षणाची तरतूद ही सार्वजनिक शक्तीच्या माध्यमातून केल्या जाते, मात्र आशासकीय स्त्रोताकडून वाजवी पातळीवर वित्तपुरवठा केल्या जातो; यालाच मध्यम प्रकारचे खाजगीकरण असे म्हटल्या जाते. आणि उच्च शिक्षणाच्या बाबतीत एक अनुदानित खांजगीकरणाचा प्रकार देखील अस्तित्वात असल्याचा दिसतो, ज्यामध्ये उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था ह्या खाजगी असतात, मात्र या संस्थाना शैक्षणिक कार्य सुरडीत चालावे याकरिता शासनाच्या माध्यमातून १०० टक्के अनुदान दिल्या जाते.

अलीकडील काळात भारतामध्ये उच्च शिक्षणाच्या बाबतीत ह्या सर्वच प्रकारचे खाजगीकरण झाल्याचे दिसते. उच्च शिक्षणात होत असणाऱ्या खाजगीकरणाचे भारतीय शिक्षण प्रणालीवर च नवे तर उच्च शिक्षणावर अतिशय दूरगामी परिणाम झाल्याचे दिसून आलीत. त्यात काही शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने महत्वपूर्ण दिसतात, तर काही बाबतीत खाजगीकरणाचा अतिशय वाईट परिणाम झाल्याचा दिसतो, यांचा आढावा प्रस्तुत शोध- निबंधामध्ये घेण्यात आलेला आहे.

**गुणवततेमध्ये वाढ** – उच्च शिक्षणाच्या बाबतीत जेव्हा अधिक जवाबदारी सार्वजनिक क्षेत्राच्या माध्यमातून उचल्या जात होती तेव्हा, सार्वजनिक क्षेत्रावर गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देणे डोईजड जात असे. या शासकीय संस्था मध्ये गुणवत्तेच्या बाबतीत स्पर्धेचा अभाव दिसून येत होता. मात्र उच्च शिक्षणामध्ये खाजगी क्षेत्रानी प्रवेश घेतला, तेव्हा जे विद्यार्थी या क्षेत्राशी जोडल्या गेले त्यांच्या अभ्यासा सोबतच गुणवत्ता पूर्ण शिक्षणावर अधिक भर देण्यात आला. तसेच अनेक संस्था मध्ये शैक्षणिक स्पर्धा सुरू झाल्या असल्या मुळे आप-आपल्या विद्यार्थ्यांच्या गुणवतेमध्ये वाढ करण्यास विशेष प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे भारतीय शिक्षण पद्धतीत गुणवतेमध्ये अधिक वाढ झाल्याचे दिसते.

**विद्यार्थ्यांच्या अंतरगुणांना चालना** – शिक्षणाचे खाजगीकरण करण्यात आल्यामुळे प्रत्येक विद्यार्थयांच्या क्षमता कडे विशेष लक्ष देणे शक्य झाले. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना ओळखून त्यांच्या गुणांना वाव देण्याचे कार्य खाजगीकरणांमुळे झाल्याचे दिसते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साध्य करण्याचे अशा खाजगी संस्थांचे उदिष्ट असल्याचे दिसते. त्यामुळे विद्यार्थ्या विविध आंतरगुणांना सार्वजनिक संस्थांच्या तुलनेत अधिक वाव मिळतांना दिसतो.

**अभ्यासक्रमांच्या बाबतीत स्वायतता** – शासकीय संस्थांना नेमून दिलेला अभ्यासक्रम शिकवावा लागतो. त्यामध्ये फारसा बदल करण्याची मुभा सार्वजनिक संस्था कडे नसते. मात्र खाजगी शैक्षणिक संस्था ह्या बदलत्या काळानुसार, गरजेनुसार आपला वियकांसात्मक दृष्टिकोण समोर ठेवून अभ्यासक्रमामध्ये वेळोवेळी बदल करतांना दिसतात. त्यामुळे अतिशय उच्च दर्जाचे शिक्षण आजच्या पिढीला प्राप्त होत असल्याचे दिसते. आणि खाजगी शिक्षणाच्या माध्यमातून आजच्या काळाला उपयुक्त असे शिक्षण लवकर प्राप्त होतांना दिसते.

**महाविद्यालयामध्ये वाढ** – खाजगी उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांचा उद्देश हा देशातील सर्व विद्यार्थ्या पर्यन्त पोहचण्याचा दिसतो. त्यामुळे ज्या ठिकाणी शासकीय संस्था शिक्षण देण्याकरिता पोहचू शकत नाही अश्या ठिकाणची उणीव खाजगी संस्था भरून काढतात. अगदी ग्रामीण भागांमध्ये देखील खाजगी शैक्षणिक संस्थाची निर्मिती झाल्याचे दिसते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर महाविद्यालय वाढल्याची दिसतात, आणि त्यातून उच्च शिक्षण प्राप्त होणे सहज शक्य झाले.

**शिक्षण संस्थांचे उत्तम व्यवस्थापन** – खाजगी शिक्षण संस्था ह्या त्यांच्या नियमांचे कठोर पालन करतांना दिसतात. विद्यार्थ्यामध्ये शिस्त निर्माण करण्याकरिता आवश्यक ती नियम आणि निर्बंध घातली जातात. खाजगी शैक्षणिक संस्था ह्या उत्तम मधील उत्तम व्यवस्थापन करणाऱ्या सक्षम आणि कौशल्यपूर्ण व्यक्तीची निवड करतात. कुशल मानवी भांडवलाच्या उपलबद्धतेमुळे खाजगी संस्था मध्ये उत्तम व्यवस्थापन केल्या जाते.

**रोजगार क्षमता** – उच्च शिक्षण प्राप्त झालेल्याना रोजगाराच्या संधी तुलनेत अधिक उपलब्ध होत असल्याचे दिसतात. त्यात कौशल्यावर आधारतीत रोजगारामध्ये अधिक वाव असल्याचा दिसतो. अलीकडील कालावधी मध्ये खाजगी शिक्षण संस्था मध्ये ज्या गुणवत्तेचे शिक्षण दिल्या त्यातून कौशल्यविहित शिक्षण देण्यावर अधिक भर दिल्या जातो. त्यातून योग्य अश्या रोजगार मिडण्याच्या संधीत वाढ झाल्याचे दिसते. खाजगी शैक्षणिक संस्थाच्या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये नोकरी, व्यवसायासाठी आवश्यक असणारे गुण निर्माण केल्या जातात. आणि अधिक कार्यक्षम मानवी भांडवलाची निर्मिती करणे शक्य झाले असल्याचे दिसते.

**तंत्रज्ञानाचा वापर** – आधुनिक स्पर्धात्मक जगात टिकून राहायचे झाल्यास नवीन आलेल्या तंत्रज्ञानाच्या बाबतीत माहिती असणे आणि ते हाताळण्याच्या बाबतीत निपुन असणे आवश्यक आहे. खाजगी शैक्षणिक संस्थाना नवीन तंत्रज्ञान विषयक माहिती विद्यार्थ्यांना पुरविणे शक्य होत असल्याचे दिसते. त्यामुळे या संस्थाच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा अधिक वापर वाढत असल्याचे दिसते.

**उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाचे तोटे.** –

**शिक्षण हा व्यवसाय बनलेला आहे.** – खाजगी शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून गडगंज असे शुल्क आकारल्या जाते. त्यामुळे उच्च शिक्षणाचे अधिक खाजगीकरण झालेले असल्या कारणाने शिक्षण घेणे सर्वसामान्य परवडत नसल्याचे दिसते. ज्यांना आर्थिक दृष्ट्या शुल्क भरणे शक्य असते असाच मर्यादित वर्ग हे शिक्षण घेत असल्याचे दिसते. शिक्षणाचे सार्वत्रिकरण करून घेणे हा उद्देश कुठतरी मागे पडतांना दिसतो.

**अविकसित भागांमध्ये सुविधा नाही.** – उच्च शिक्षणाचा पुरवठा करणे हे अत्यंत खर्चीक बाब असल्यामुळे, ज्या ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध असतील त्या ठिकाणीच अश्या खाजगी संस्था शैक्षणिक संस्था उभारण्यास पसंती देत असल्याचे दिसतात. त्यामुळे मागास भागात अश्या संस्थांची निर्मिती केल्या जात नाही अथवा तिथे यांचा विकास होत नसल्याचे दिसते. त्यातून तुलनेत मागास भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षण घेण्याची तेवढी संधि मिळत नसल्याचे दिसते.

**पदवी गुणवत्ता आधारित नाही** – खाजगी संस्था मध्ये बहुसंख्य विद्यार्थी श्रीमंत आणि आर्थिक दृष्ट्या मजबूत वर्गातील असल्याचे दिसतात. या वर्गांमध्ये फारसा संघर्ष अनुभवयास येत नसल्यामुळे त्यांना शिक्षणाची तेवढी अधिक आवश्यकता भासत नाही किंवा ते आवश्यक तेवढा शिक्षण घेण्याकरिता वेळ देतीलच अस होत नाही. त्यामुळे त्यांच्या कडे तेवढी गुणवत्ता निर्माण होईलच असे दिसत नाही. मात्र संस्थेचा निकाल चांगला लागावा, प्रतिष्ठा टिकून राहावी म्हणून गुणवत्ता नसलेल्या विद्यार्थ्यांना देखिल पदवी प्रदान केल्या जाते.

**आर्थिक दृष्ट्या मागासलेल्यांना शिक्षणाची संधि नाही.** – खाजगी शैक्षणिक संस्था ह्या स्वत:च्या नफ्या करीता काम करीत असल्याचे दिसतात. या संस्थायातून शिक्षण घ्यायचे झाल्यास भरभरून शुल्क आकारले जातात. त्यात पैशा अभावी बरेच विद्यार्थी हे या संस्थायातून शिक्षण घेणे टाळत असल्याचे दिसतात. शिक्षणाची संधि मिडत नसल्या कारणाने त्यांना चांगल्या रोजगाराच्या संधी प्राप्त होत नाही आणि कमी मोबादल्यांमधे त्यांना कामे करावी लागतात. त्यामुळे राहणीमनाच्या दर्जावर नकारात्मक परिणाम होऊन ते आर्थिक दृष्ट्या मागासलेलेच राहत असल्याचे दिसतात.

**निष्कर्ष** –

कोणत्याही राष्ट्रांचा विकास हा त्या राष्ट्रांच्या शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असतो. अलीकडील काळात भारतामध्ये खाजगीकरणामुळे उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था मध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसते. तसेच देशाचा विकास साधण्याकरिता शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्रोत्साहन मिळत असल्याचे दिसते. बाह्य जगाशी स्पर्धा करीत असतांना खाजगी शिक्षण संस्था मधून शिक्षण घेतलेले विद्यार्थी हे अधिक तरबेज असल्याचे दिसतात. विद्यार्थ्यांनां व देशाच्या विकासाला उच्च शिक्षणाचे होणारे खांजगिकरण हे अतिशय उपयुक्त असल्याचे दिसते.

तसेच उच्च शिक्षणाच्या होणाऱ्या बेमाफ खाजगीकरणांमुळे भरतातील सामाजिक न्यायाच्या संदर्भात तसेच विषमता वाढीच्या दृष्टीने अनिष्ट परिणाम होतांना दिसतात. खाजगी संस्था मार्फत दिल्या जाणारे उच्च शिक्षण अतिशय महाग असल्या कारणाने ते सर्वांच्या अवक्यात येईल असे नाही. यातून शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे हा मूळ उद्देश कुठतरी दूर जातांना दिसतो. गुणवत्ता पूर्ण उच्च शिक्षणाच्या उपलब्धतेच्या संदर्भात खाजगी संस्थांचे महत्व कमी करून चालणार नाही. मात्र काही धोरणात्मक मुलभूत सुधारणा याठिकाणी होणे आवश्यक असल्याचे दिसतात.

**उपाययोजना व शिफारशी –**

- खाजगी संस्थांच्या माध्यमातून आकारल्या जाणाऱ्या शैक्षणिक शुल्काच्या संदर्भात नियमावली करायला हवी.
- आर्थिक दृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांना खाजगी संस्थायातून शिक्षण घेण्याकरिता विशेष निधी उभारायला हवा, त्यातून शैक्षणिक शुल्क, हॉस्टेल शुल्क, मेस चे पैसे, शैक्षणिक साहित्य, गणवेश यासारख्या शिक्षणाशी निगडीत असलेल्या मूलभूत बाबिवर खर्च करायला हवा.
- खाजगी शिक्षणाचे जे व्यावसायिकरण झालेले आहे त्यावर शासनाच्या माध्यमातून नियंत्रण आणि नियमन करून शैक्षणिक कार्याकरिताच त्याचा उपयोग होईल याकडे लक्ष पुरवावे.
- ज्या भागात शासनाला उच्च शिक्षणाच्या संदर्भात सुविधा पुरविणे शक्य होत नाही, अथवा एखाद्या ठिकाणी शासकीय शैक्षणिक संस्थेवर अधिक भार पडत असेल तर त्याठिकाणी आवर्जून खाजगी शैक्षणिक संस्थांच्या निर्मितीला प्रोत्साहन द्यावे.
- विशेषत: मागासलेल्या भागात, ग्रामिण भागात किंवा शैक्षणिक दृष्ट्या मागास अविकसित भागामध्ये खाजगी संस्थांचा प्रसार होण्यास पूरक वातावरण निर्माण करावे.
- शासनाच्या माध्यमातून उच्च शिक्षणातील गुणवत्ता टिकविण्याकरीता जे निकष लागू केलेले आहेत त्यांची अमलबजावणी ही खाजगी शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून व्हायला हवी.
- रोजगारभिमुख शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात यावा.
- खाजगी शिक्षण संस्थांनी मागास भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याकरिता आकर्षित करायला हवे.

**संदर्भ –**

1. पवार, दि. कृ., (२०२१), उच्च शिक्षण व सीमांत समूह – परिवर्तन आणि आव्हाने, श्री. साईप्रकाशन, नागपूर
2. मिर्झा, मा. आणि झैबुन, नि. (२०२०), उच्च शिक्षणाचे खाजगीकरण; विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोणावर एक अभ्यास. लखनौ.
3. बहल, पु. (२०१७), प्राइव्हेटायझेशन ऑर हायर एड्युकेशन ; मीरिट्स अँण्ड डिमीरिट्स., सोनपत.
4. "भारतीय जनगणना- २०११' भारत सरकार, न्यू दिल्ली.
5. शेख, यू. अ. (२०१७), "हायर एज्युकेशन इन इंडिया; चॅलेंज अँड
6. एज्युकेशन इन इंडिया: क्युस्ट फॉर ऑपोरच्युनिटी, जनरल ऑफ एज्युकेशन अँड प्रॅक्टिसेस, अंक ८, खंड १, पृष्ट क्र. ३९ ते ४२.
7. भालचंद्र, के. के. (१९८६), "हायर इकव्यालिटी अँड इक्विटी", मेंसस्त्रीम.
8. ब्रिटिश काऊंसिल,(२०१४), अंडरस्टॅडिंग इंडिया – द फ्यूचर ऑफ हायर एज्युकेशन,अँड ऑपोरच्युनिटी फॉर इंटरनॅशनल कॉपरेशन
9. कुमार, अ. आणि अंबरिश, (२०१५), हायर एज्युकेशन ग्रोथ, चॅलेंज अँड ऑपोरच्युनिटीस, इंटरनॅशनल जनरल ऑफ आर्ट्स, हयूम्यानीटिस अँड मॅनेजमेन्ट स्टडीस, खंड ०१, अंक २.
10. वाल्श, व्हि. (१९९२), "टेक्नॉलॉजी अँड द एकोनॉमी; द की रिलेशनशिप.", रिसर्च पॉलिसी २३ (४) : ४७३-४७५, पॅरिस, OECD.
11. शर्मा, सा., शर्मा पु. (२०१५), इंडियन हायर एज्युकेशन सिस्टिम: चॅलेंज अँड सजेशन्स, इलेक्ट्रोनिक जनरल फॉर इंक्लूसिव एज्युकेशन, अंक ३, खंड ४ पृष्ट क्र. ३-४.
12. अर्नस्ट अँड यंग (२०११), प्रायवेट सेक्टर पार्टीसीपेशन इन इंडियान हायर एज्युकेशन समिट २०११, http://www.ey.com/publication/vwLUAssets/Private_sector_participation_in_Indian_higher_education/$FILE/Private_sector_participation_in_Indian_higher_education.pdf